राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. अर्थमंत्री या नात्याने पवार यांचा हा १० वा अर्थसंकल्प आहे. आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारीचा समावेश जागतिक वारसा यादीत करण्याची मागणी करणारा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. वारीतल्या पालख्यांसाठी यंदापासून २० हजार रुपयांचा निधी राज्यसरकार देणार आहे.

२१ ते ६० वयोगटातल्या महिलांसाठी ‘मुख्यमंत्री : लाडकी बहीण’ योजना जुलै २०२४ पासून लागू होणार असून, त्याकरता दरवर्षी ४६ हजार कोटी रुपयांची राखीव तरतूद करण्यात आली आहे. पात्र कुटुंबांना दरवर्षी तीन गॅस सिलिंडर्स मोफत देण्याची तरतूद करणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना लागू करण्यात येणार असून त्याचा लाभ ५२ लाख १६ हजार ४१२ कुटुंबांना होणार आहे.

शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजनांसाठीच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात मांडली आहे. गेल्या खरीप हंगामाकरता ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून, कापूस आणि सोयाबीन शेतकऱ्यांना २०२३-२४ च्या खरीप पणन हंगामासाठी प्रतिहेक्टर ५ हजार रुपयांचं अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

याखेरीज गोपालक शेतकऱ्यांना प्रतिलीटर ५ रुपये अनुदान, बांबूशेतीसाठी अनुदान, सौर कृषीपंप इत्यादी योजनांचे प्रस्ताव अर्थसंकल्पात आहेत.

दरवर्षी १० लाख युवक युवतींना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रत्येकी १० हजार रुपये दरमहा विद्यावेतन देण्याची तरतूद अर्थसंकल्पात आहे. विधानपरिषदेत अर्थराज्यमंत्री दीपक केसरकर अर्थसंकल्प सादर करीत आहेत.

**<><><><><>**

अवकाळी पावसामुळे शेतीचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १५ जुलैपर्यंत मदत देऊ, असं आश्वासन सरकारने आज विधानसभेत दिलं. अवकाळी पावसामुळे

राज्यातल्या दोन लाख ९१ हजार हेक्टरहून अधिक शेतीचं नुकसान झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी दिली. शेतकऱ्यांना नेमकी किती मदत मिळणार हे जाहीर करावं, अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

महानंद डेअरी NDDB अर्थात नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाला चालवायला दिली तरी महानंद ब्रँड कायम राहणार आहे, पाच वर्षात डेअरी नफ्यात आली तर सरकार ती पुन्हा चालवायला घेईल, असं दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

कोणत्याही पबमध्ये वय न तपासता प्रवेश दिला तर पबचा परवाना रद्द केला जाईल, तसंच गुन्हा दाखल केला जाईल अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी लक्षवेधी सूचनेवर चर्चा करताना दिली. आमदार सुनील प्रभू यांनी ही लक्षवेधी उपस्थित केली होती. याप्रकरणी कोणत्याही मंत्र्याने पोलिसांवर दबाव आणलेला नाही. स्थानिक आमदारांनी याप्रकरणी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला होता, असं फडनवीस म्हणाले.

**<><><><><>**

वैद्यकीय प्रवेश परीक्षा - नीट मधल्या गैरप्रकारांविषयी चर्चेची मागणी करत विरोधी पक्षसदस्यांनी गदारोळ केल्यामुळे, आज लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावर आज चर्चा होणार होती. मात्र लोकसभेत कामकाज सुरु होताच वैद्यकीय प्रवेश परीक्षा-नीट प्रकरणी चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी केली. सभापती ओम बिर्ला यांनी ती अमान्य केल्यानं विरोधकांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही या मुद्यावर चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी केली, त्यावर अधिवेशन काळात या मुद्द्यावर विस्तृत चर्चा करता येईल, असं राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं. त्यावर विरोधकांनी गदारोळ केल्यानं कामकाज एका तासासाठी तहकूब करण्यात आलं.  त्यानंतर कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर राष्ट्रपतींच्या  अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावर चर्चा सुरु झाली.

आज दोन्ही सभागृहांमध्ये दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या रविवारी आकाशवाणीवरुन मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी ११ वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा १११ वा भाग असेल.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला  कसोटी सामना चेन्नईच्या चिदंबरम स्टेडिअमवर सुरु आहे. भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर हिनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. स्मृती मांधाना आणि शेफाली वर्मा या दोघींनी आज शतकं ठोकली. स्मृतीनं १४९ धावा केल्या, तर शेफालीनं नाबाद १७७ धावा केल्या आहेत.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २ बाद ३७१ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

सुप्रसिद्ध अमरनाथ यात्रेला आजपासून आरंभ झाला. जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला जम्मूहून रवाना केलं. पहलगामहून उद्या यात्रा सुरु होईल. प्रशासनानं यात्रेकरूंसाठी ऑनलाईन नोंदणीसोबतच ऑफलाईन नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे.

वैद्यकीय प्रमाणपत्र आणि वैध ओळखपत्रासोबत असलेल्या यात्रेकरूंना २५० रुपये शुल्क भरून नोंदणी करता येईल.

//<><><><><> //